**ठळक बातम्या**

- पेपरफुटी आणि परीक्षेतल्या गैरप्रकारांवर कठोर शिक्षा करणाऱ्या विधेयकाच्या मसुद्याला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

- नीट पेपरफुटी रोखण्यासाठी सरकार करत असलेल्या उपाययोजनांवर सर्वोच्च न्यायालय बारकाईनं लक्ष ठेवणार

- नीट पेपरफुटी प्रकरणावरुन संसदेचं कामकाज आजही तहकूब, सरकारची पुन्हा आंदोलकांशी चर्चा

- पेपरफुटीसंदर्भातल्या विविध खटल्यांच्या सुनावणीसाठी छत्रपती संभाजीनगर आणि नागपूरमध्ये विशेष न्यायालयांची स्थापना

**आणि**

- आषाढी निमित्त पंढरपुरात लाखो भाविक दाखल

**<><><><><>**

केंद्रीय मंत्रीमंडळानं पेपरफुटी आणि परीक्षेतल्या गैरप्रकारांच्या संदर्भातल्या विधेयकाच्या मसुद्याला आज मंजुरी दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली संसद भवन परिसरात ही बैठक झाली आहे. संसदेत येत्या आठवड्यात हे विधेयक मांडल जाण्याची शक्यता सुत्रांनी वर्तवली आहे. जलदगती न्यायालयांची स्थापना करणं, दोषींना कठोर शिक्षा करणं अशा तरतुदी या विधेयकात आहेत. पेपरफुटीच्या संघटीत प्रयत्नांना रोखण्यासाठी १० कोटी रुपयांपर्यंतचा दंड आणि १० वर्षांपर्यतच्या शिक्षेची तरतूद यात असल्याचं सुत्रांनी सांगितलं. विद्यमान कायद्यात ५ ते १० वर्षांची कैद आणि १ कोटी रुपयांपर्यंतचा दंड आकारण्याची तरतूद आहे.

भव्य रसायन अर्थात भारत औद्योगिक विकास योजना रसायनला सुद्धा मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. त्यात ३ रसायन पार्क उभे करण्याचे नियोजन आहे, असं माहिती प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

**होल्ड- अश्विनी वैष्णव बाइट (१९ सेकंद)**

कर्नाटकातल्या बल्लारीपासून आंध्रप्रदेशातल्या गुंटकल दरम्यान चौथा रेल्वे मार्ग टाकायलाही मंत्रीमंडळाच्या आर्थिक व्यवहार समितीनं मान्यता दिली.

**<><><><><>**

नीट पेपरफुटी रोखण्यासाठी सरकार करत असलेल्या उपाययोजनांवर बारकाईनं लक्ष ठेवणार असल्याचं सर्वोच्च न्यायालयानं आज स्पष्ट केलं. पारदर्शकता, राधाकृष्णन समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी आणि आयआयटीच्या पद्धतीची अंमलबजावणी यासंदर्भात सरकारनं माहिती द्यावी असं सर्वोच्च न्यायालयानं महा अधिवक्ता तुषार मेहता यांना सांगितलं. या सर्व सुधारणांवर सर्वोच्च पातळीवरुन लक्ष ठेवलं जात असून त्याचा सविस्तर अहवाल लवकरच न्यायालयासमोर मांडू असं ते म्हणाले. दुर्घटना घडल्यावर उपाययोजना करण्यामुळं अनेक वर्ष त्रास होतो आहे. आता पेपरफुटी रोखण्यासाठी यंत्रणेत सुधारणा करण्याची गरज न्यायमूर्ती पी. एस. नरसिम्हा यांनी यावेळी व्यक्त केली.

**<><><><><>**

नीट परीक्षेचे पेपर फुटल्याच्या तसंच विद्यार्थी आंदोलनाच्या मुद्द्यावरुन आजही संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे प्रचंड गदारोळ झाला. गदारोळामुळे कामकाज येत्या सोमवारपर्यंत तहकूब करण्यात आलं.

“वंदे मातरम्” या राष्ट्रीय गीताचा अपमान करणं, अथवा त्यात व्यत्यय आणण्याला गुन्हा ठरवणारं विधेयक आज केंद्रसरकारने राज्यसभेत सादर केलं. केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय “राष्ट्रीय गौरवाचा अपमान प्रतिबंधक विधेयक” सादर करत असताना डाव्या पक्षांच्या अनेक सदस्यांनी विरोध दर्शवला. वंदे मातरम् गीताच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्त या गीताला राष्ट्रगीत “जन गण मन” प्रमाणेच वैधानिक कवच प्रदान करण्यासाठी हे विधेयक सरकारने आणलं आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या प्रतिनिधींनी आज पुन्हा कॉकरोच जनता पार्टीच्या प्रतिनिधींसोबत चर्चा केली. आंदोलकांच्या प्रतिनिधींशी २ तास चर्चा झाली, त्यांनी ३ मागण्या केल्या

असल्याची माहिती केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी या चर्चेनंतर दिली. उद्या पुन्हा चर्चा होणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**होल्ड - नड्डा (२० सेकंद)**

शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा, आंदोलकांवर झालेल्या मारहाणीप्रकरणी माफी आणि नीट परीक्षा रद्द झाल्यामुळं आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना १ कोटी रुपयांची आर्थिक मदत अशा मागण्या सरकारसमोर ठेवल्याचं पक्षाचे प्रवक्ते सौरव दास यांनी सांगितलं.

**होल्ड - सीजेपी बाइट (१० सेकंद)**

**<><><><><>**

नीटसह विविध परीक्षांमधल्या गैरप्रकारांशी संबंधित गुन्ह्यांच्या खटल्यांसाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद आणि नागपूर इथं पीठांमधे विशेष न्यायालयं स्थापन झाली आहेत. यासाठी जलदगती न्यायालयं स्थापन करण्याची घोषणा केंद्र सरकारनं काल केली, त्यानुसार मुंबई उच्च न्यायालयानं छत्रपती संभाजीनगरचे अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी एस. व्ही. पवार आणि नागपूरचे अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी गुलशन कोलते यांची विशेष न्यायाधीश म्हणून नियुक्ती केली आहे. 'सार्वजनिक परीक्षा -अयोग्य मार्गांचा प्रतिबंध- कायद्या'अंतर्गत येणाऱ्या गुन्ह्यांच्या खटल्यांसाठी ही न्यायालयं निश्चित केली आहेत. २०२४ च्या या कायद्यानुसार, अशा प्रकरणांमधल्या खटल्यांची प्रक्रिया ३ महिन्यांच्या आत पूर्ण करणं आवश्यक आहे.

दिल्ली उच्च न्यायालयानंही अशा खटल्यांच्या सुनावणीसाठी अनु ग्रोव्हर बालीगा यांची विशेष न्यायाधीश म्हणून नियुक्ती केली आहे.

दरम्यान, नीट पेपरफुटी प्रकरणी महाराष्ट्रातला आरोपी शिवराज मोटेगावकर याचा जामीन अर्ज विशेष न्यायाधीश अजय गुप्ता यांनी फेटाळला आहे.

**<><><><><>**

आषाढी एकादशी निमित्त उद्या पंढरपूर मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महापूजा होणार आहे. यंदा पंढरपुरात आषाढी यात्रेसाठी सुमारे तीस लाखांवर भाविक आल्याचा अंदाज आहे. वारकऱ्यांची दर्शनरांग २१ किलोमीटरपर्यंत पोहोचली आहे. या सर्व

यात्रेकरुंच्या व्यवस्थेचा आढावा मुख्यमंत्र्यांनी घेतला. संत तुकाराम महाराज आणि ज्ञानेश्वर माऊलींच्या पालख्या आज पंढरपूर मध्ये दाखल होतील.

त्यापूर्वी मुख्यमंत्र्यांनी आज सोलापूर मध्ये राज्यस्तरीय कृषि पंढरी प्रदर्शनाचं उद्घाटन केलं. राज्यातल्या सर्व शेतकऱ्यांनी महाविस्तार ॲप वापरावं, असं आवाहन त्यांनी केलं.

- **- - होल्ड- मुख्यमंत्री - -**

- **<><><><><>**

राज्यातील पावसामुळे धरणांमधील पाणीसाठ्यात वाढ होत असून, जलसंपदा विभागाच्या आजच्या अहवालानुसार राज्यातील 3 हजार 29 धरणांमध्ये 53 टक्क्यांपेक्षा जास्त उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. गेल्या वर्षी याच दिवशी हा साठा 63 टक्क्यांपेक्षा जास्त होता.

विभागनिहाय पाहता, कोकण विभाग सर्वाधिक साडे 76 टक्के पाणीसाठ्यासह राज्यात प्रथम क्रमांकावर आहे. त्यापाठोपाठ पुणे विभाग 65 टक्के, नाशिक 55 टक्के, नागपूर पावणे ४७ टक्के, अमरावती सुमारे ४३ टक्के तर छत्रपती संभाजीनगर विभागात सर्वात कमी म्हणजे 25 टक्के पाणीसाठा आहे.

**<><><><><>**

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सातही धरण क्षेत्रात दमदार पाऊस पडल्यानं धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ होत आहे. गेल्या २४ तासांत त्यात पावणे ८ टक्के वाढ होउन तो आता पावणे ७८ टक्क्यावर पोहोचला आहे. मुंबईची वर्षभराची पाण्याची गरज भागवण्यासाठी धरणांमधे १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लिटर पाणी साठ्याची गरज भासते. आज रोजी सातही धरणात मिळून ११ लाख २३ हजार ४४३ दशलक्ष लिटर पाणी साठा उपलब्ध आहे.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांमध्ये निर्माण झालेल्या पूरस्थिती राबवलेल्या बचावकार्यात २४४ नागरिकांची सुरक्षित सुटका झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

डहाणू, तलासरी आणि पालघर तालुक्यातल्या अनेक गावांचा संपर्क तुटला. अनेक रस्ते पाण्याखाली गेले, आणि अनेक गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली. परिस्थितीचं गांभीर्य लक्षात घेत जिल्हा प्रशासनानं तातडीनं आपत्कालीन यंत्रणा सक्रिय केली. एनडीआरएफ,

अग्निशमन दल, स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्रामस्थ यांच्या समन्वयातून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी बचाव आणि मदतकार्य सुरू ठेवलं.

पुराचं पाणी ओसरू लागल्यानंतर बाधित घरं, शेती, पशुधन आणि इतर नुकसानीचे पंचनामे करुन पात्र नागरिकांना आवश्यक ती मदत देण्याची प्रक्रिया तातडीनं राबवणार असल्याचं प्रशासनानं स्पष्ट केलं आहे. मुसळधार पावसामुळे पालघर जिल्ह्यात वीज वितरण यंत्रणेचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू आहे.

**<><><><><>**

कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी, विदर्भात काही ठिकाणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. मध्य महाराष्ट्रात जोरदार ते अति जोरदार पावसासह तुरळक ठिकाणी अतिवृष्टी झाली. कोकणात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी तर विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**